**डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला**
**कृषि संशोधन केंद्र, अंजनगाव रोड, अचलपुर**
**दुरध्वनी**[कार्यालय]-०७२२३/२२०११
**ईमेल**:arsachalpur@pdkv.ac.in
arsachalpur@gmail.com

जा.क्र. कृसंके/अचल./उद्यानविद्या/ 580 /२०२१
कृषि संशोधन केंद्र, अचलपूर
सहयोगी प्राध्यापक (कृषिविद्या) यांचे कार्यालय
दिनांक- 5 / ०८/२०२१

## लिलाव सुचना

कृषि संशोधन केन्द्र, अचलपूर येथील प्रक्षेत्रावरील खोडवा फळझाडांवरील केळी फळांचा खुल्या लिलाव पध्दतीने विक्री करावयाचा आहे. सदर लिलाव दिनांक १२/०८/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता कृषि संशोधन केन्द्र, अचलपूर येथील कार्यालयीन सभागृहात आयोजित केला आहे.

## केळी फळांच्या जाहीर लिलावाच्या अटी व शर्ती

**कृषि संशोधन केन्द्र, अचलपूर येथील प्रक्षेत्रावरील फळझाडांवरील केळी फळांचा जाहीर लिलाव खालील अटीनुसार करण्यात येईल.**

१. लिलावामध्ये प्लॉट क्र. ०१ मधील खोडवा झाडावरील केळीची घडे राहतील.

२. कमीत कमी तीन किंवा त्यापेक्षा जास्त बोली बोलणारे असतील तेव्हाच लिलाव पुकारण्यात येईल.

३. बोलीमध्ये भाग घेण्यापुर्वी खरेदीदारांना बोलीत भाग घेण्याकरीता रू ५०००/— (रुपये पाच हजार फक्त) रक्कम जमा करावी लागेल. **सदर लिलावामध्ये बोली ही क्विंटल प्रमाणे बोलावी लागेल.** लिलाव घेतला असेल त्याचे सह प्रथम तीन उच्चतम बोली धारक सोडून इतर सर्वाची रक्कम लिलाव संपताच परत करण्यात येईल. लिलाव घेणाऱ्या व्यतिरिक्त इतर दोन बोली धारकांची रक्कम, लिलाव घेणाऱ्याने पैसे भरताच परत करण्यात येईल. उच्चतम बोली बोलून लिलाव घेण्या—याने बोलीची रक्कम न भरल्यास दुस—या क्रमांकाच्या बोली धारकास लिलाव देण्यात येईल व दुस—या क्रमांकांच्या बोली धारकाने बोलीची रक्कम न भरल्यास तिस—या क्रमांकांच्या बोली धारकास लिलाव देण्यात येईल.

४. उच्चतम बोली धारकाने लिलावाच्या दिवशी रुपये ५०००/— व लिलाव तारखेपासुन ७ (सात) दिवसाचे आंत रुपये ५०००/— असे एकूण रुपये १००००/— (दहा हजार फक्त) सुरक्षा ठेव म्हणून भरणा करावी लागेल. त्याशिवाय फळे तोडता येणार नाही. ज्या दिवशी केळीच्या घडांची तोडणी करण्यात येईल त्या दिवशी सदर घडांचे वनज करुन लिलावात ठरल्या प्रमाणे क्विंटलच्या भावाने आलेली रक्कम कार्यालयास जमा करावी लागेल. म्हणजेच ज्या दिवशी घडांची तोडणी होईल त्या दिवशी क्विंटल प्रमाणे रक्कम कार्यालयास जमा करावी लागेल.

५. फळाची तोडणी करण्याची अंतिम मुदत दिनांक ३०/११/२०२१ ही राहील. गरज भासल्यास मुदत वाढविण्याबाबत लिलाव कमेटीचा निर्णय अंतिम राहिल.

६. लिलावाची क्विंटल प्रमाणे अपेक्षित किंमत न आल्यास लिलाव कमेटी लिलाव रद्द करेल.

७. फळे तोडतांना कुठलेही नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल. नुकसान झाल्यास त्याची भरपाई खरेदीदाराकडून करण्यात येईल.

८. लिलावाची अंतिम बोली ग्राहय झाल्यावर संबधीत खरेदीदारास रू १००/— चे जनरल स्टॅम्प पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल.

९. लिलाव मंजूर झाल्यावर फळबाग राखणीची जबाबदारी, फळांची तोडणी तसेच राखणदाराची राहण्याची व्यवस्था करणे खरेदीदाराकडेच राहील.

१०. खते, ओलीत किंवा अन्य कोणतीही मशागत विद्यापीठाचे वेळापत्रकानुसारच केल्या जाईल.

११. नैसर्गिक आपत्तीमुळे काही नुकसान झाल्यास त्याकरिता हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

१२. कोणत्याही कारणावरून खरेदीदार व केन्द्राचे अधिकारी यांच्यामध्ये वाद निर्माण झाल्यास अंतिम निर्णय हा मा. संशोधन संचालक, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचा दोघांनाही बंधनकारक राहील.

१३. काही कारणावरून बोली बोलणाऱ्यास अपात्र ठरविण्याचा अधिकार लिलाव कमेटीस राहील.

१४. संपूर्ण फळे तोडणी झाल्यानंतर लिलाव घेणाऱ्यास सुरक्षा ठेव (Security Deposit) परत मिळण्याकरिता प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र, अचलपुर या नावाने अर्ज करावा लागेल व त्यानंतर सुरक्षा ठेव परत करण्यात येईल.

१५. सुरक्षा ठेव रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

१६. कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास लिलाव कमेटी नुकसान किंमत ठरवेल व सुरक्षा ठेव रक्कमेमधून कपात करण्यात येईल.

१७. उच्चतम बोली धारकाने लिलावाचे दिवशी रुपये ५०००/— व लिलाव तारखेपासून ७ (सात) दिवसाचे आंत रुपये ५०००/— असे एकूण रुपये १००००/— (रुपये दहा हजार फक्त) सुरक्षा ठेव रक्कम भरणा केला नाही तर लिलावामध्ये भाग घेण्याकरीता भरणा केलेली रक्कम रूपये ५०००/— परत मिळणार नाही व त्याबाबत कोणताही उजर राहणार नाही व ताबडतोब लिलावाची पुढील कार्यवाही करण्याबाबत लिलाव कमेटी ठरवेल.

१८. प्रयोगाच्या कामाकरीता प्लॉट क्र. ०१ मधील मोठया आकाराची निवडक १०० घडे राखुन ठेवावी लागतील.

प्रभारी अधिकारी
कृषि संशोधन उपकेंद्र
अचलपूर, जि.अमरावती

**प्रतिलीपी—**

**१.मा. प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन माहिती प्रणाली कक्ष, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला** यांना माहिती तथा उपरोक्त फळांच्या लिलावाच्या जाहिरातीचे प्रारुप कृषि विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावे हि विनंती.

२. कृषि उत्पन्न बाजार समिती, अचलपूर यांच्या नोटीस बोर्डावर

३. कार्यालयीन नोटीस बोर्डावर